**—न्यायनिर्णय—**

(आज दिनांक २३.०४.२०२६ रोजी घोषीत)

आरोपी विरुध्द कलम ६५ (फ) महाराष्ट्र दारूबंदी कायदया अंतर्गत दंडनिय अपराधा करीता आरोप ठेवण्यात आले.

२. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या साहीत्यावरून माझ्यासमक्ष विचाराधिन मुद्दे आणि निष्कर्ष कारणमीमांसासह खालील प्रमाणे आहे :—

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक ०२/११/२०२३ रोजी मौजा लोधीटोला ता. तिरोडा, जि. गोंदिया येथे आरोपीच्या ताब्यातुन २९६० लीटर मोहासडवा असे एकूण किमंत रूपये २,३६,८००/— विना परवाना अवैधरित्या मिळुन आले ? | **नाही.** |
| २. | कुठला गुन्हा शाबीत झाला काय? | **नाही.** |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

३. आरोपीविरूध्द पुरावा न आल्याने त्याचे फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे बयाण नोंदविण्यात आले नाही. तसेच सरकारीपक्षाने जप्ती पंचनामा सही पुरता **नि.क्र.१३** वर भिस्त ठेवलेली आहे.

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र. १ ते ३ :**

४. अभियोगपक्षाने आपली बाजू सिध्द करण्याकरिता पंच नितेश

कुलपत उपराडे (सा.क्र.०१) व दुसरा पंच साक्षीदार विकास छोटेलाल लिल्हारे (सा.क्र.०२) यांची साक्ष नोंदविली. त्यांनी आपल्या सरतपासणीमध्ये पोलिस स्टेशनचे अधिका—यांनी त्यांना पंच म्हणुन बोलविले नव्हते असे सांगितले. त्याचप्रमाणे त्यांनी जप्ती पंचनामा वर त्यांची सही असल्याचे सांगीतले असून मजकुर माहित नसल्याचे सांगितले. यावरून असे लक्षात येते की, सदर साक्षदारांना प्रस्तुत प्रकरणामधील मुद्देमालाच्या जप्तीबद्दल काहीही माहिती नाही. यावरून असे दिसते की, सदर साक्षदारांनी अभियोगपक्षाच्या समर्थनार्थ साक्ष दिली नाही.

५. अशा प्रकरणात स्वतंत्र पंच साक्षदारांची साक्ष महत्वाची असते. परंतु या प्रकरणातील स्वतंत्र पंच नितेश कुलपत उपराडे (सा.क्र. ०१) व दुसरा पंच साक्षीदार विकास छोटेलाल लिल्हारे (सा.क्र. ०२) यांची साक्ष लक्षात घेता असे निदर्शनास येते की, अभियोगपक्षाने आरोपीच्या ताब्यातुन २९६० लीटर मोहासडवा जप्त केला हे सिध्द केले नाही. जप्ती पंचनामा हा सरकारीपक्षाने सिध्द केलेला नाही. सीए रिपोर्ट दाखल केलेला नाही. जरी वादाकरिता आरोपीकडून काही जप्त झाले हे गृहित धरले तरी जप्त वस्तु ही मोहासडवा होता हे सिध्द होत नाही. म्हणुन अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत केला असे ग्राह्य धरता येणार नाही. म्हणुन मला असे वाटते की, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द वरील कलमान्वये गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला. म्हणुन मी मुद्दा क्र. १ ते २ चे उत्तर नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्रमांक ३ ला अनुसरून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## **आदेश**

१. आरोपीची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५—फ च्या

गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त शिल्लक मोहाफुल हातभट्टी दारू राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया यांनी अपीलाचा कालावधीनंतर विल्हेवाट लावावी.

३. या प्रकरणामध्ये आरोपीने दिलेली जमानत पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल व त्या जमानतीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) अन्वये जमानत म्हणुन ग्राहय धरण्यात येईल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)

Digitally signed by AMIT SURESH AGRAWAL
Date: 2026.04.23 15:55:27 +0530

**दिनांक : २३/०४/२०२६** **(अमित सुरेश अग्रवाल)**
**स्थळ : तिरोडा** **न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी,**
**तिरोडा.**